## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचाउमवि/०५/संलग्नता/जीएसटी/२०५/२०२५ दि.०९/०७/२०२५

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत,**
**सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व परिसंस्थांचे मा.संचालक यांना......**

**विषय :-** मा.व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. व्य.प.ए.-१९८/२०२४ दि. २०/०९/२०२४ नुसार जुलै, २०१७ ते आजपावेतो संलग्नता शुल्क व इतर शुल्कावर १८ % जी.एस.टी. व्याज व दंडासह भरणेबाबत..

**संदर्भ :-** ०१) मा.व्यवस्थापन परिषद ठराव क्र. व्य.प.ए.-२१४/२०२४ (५) दि. १०/१२/२०२४
०२) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. कबचौउमवि/५/संलग्नता/३७६/२०२४ दि. १५/१०/२०२४

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयांच्याअनुषंगाने कळविण्यात येते की, मा.व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. व्य.प.ए.-१९८/२०२४ दि. २०/०९/२०२४ नुसार जुलै, २०१७ ते आजपावेतो संलग्नता शुल्क व इतर शुल्कांवर १८ % जी.एस.टी. व्याज व दंडासह विद्यापीठास अदा करणेबाबत विद्यपीठाच्या संलग्नता विभागाचे परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

वरील बाबत विविध शैक्षणिक संस्था यांनी विद्यापीठाकडे जी.एस.टी. संदर्भात पुनविर्चार होणेबाबत विनंती पत्र सादर केले होते. सदर बाब विचारात घेता धोरणात्मक व कायदेशिर बाबी विचारात घेवून निर्णय घेण्यासाठी विद्यापीठाने समिती नियुक्त केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ गोवा, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

०१) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून संलग्नता शुल्कावर १८ % जीएसटी भरणेबाबत विद्यापीठाने निर्गमित केलेले यापूर्वीचे परिपत्रक निष्प्रभावित (Revert) करण्यात येत आहे.

०२) संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून संलग्नता शुल्कावर १८ % जीएसटी तूर्त भरु नये. भविष्यात मा.न्यायालयाच्या आदेशान्वये जीएसटी बाबत जबाबदारी निर्माण झाल्यास सदर जीएसटी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्थांना भरणे बंधनकारक राहील.

०३) भविष्यात जीएसटीची जबाबदारी (Liability) निर्माण झाली तर संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था यांनी त्यांच्या महाविद्यालयावर/परिसंस्थेवर आर्थिक भार पडू नये यासाठी संबंधित महाविद्यालये/परिसंस्था यांनी त्यांच्या संस्थेच्या अंदाजपत्रकात आर्थिक वर्ष २०१७-२०१८ पासून विद्यापीठास अदा केलेल्या संलग्नता शुल्कावर १८% जीएसटी रक्कम परिगणना करावी व तेवढी तरतूद करुन आवश्यक तेवढा निधी राखून ठेवण्यात यावा.

**(कृ.मा.प.)**

०४) ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून विस्तारांचे प्रस्ताव सादर करतेवेळी संलग्नता शुल्कासोबत १८% जीएसटी विद्यापीठास अदा केलेला असेल अशा महाविद्यालयांना जीएसटी शुल्क परत करण्यात येईल.

तरी समितीने केलेल्या वरीलप्रमाणे शिफारशींची नोंद घेवून कार्यवाही करावी. तसेच ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून विस्तारांच्या प्रस्तावासोबत १८ % जीएसटी अदा केलेला असेल त्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी जीएसटी भरल्याच्या पावतीच्या छायांकित प्रती सादर केल्यास जीएसटीची रक्कम परत करणे संदर्भात पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

**आपली विश्वासू,**

**उपकुलसचिव**
**(संलग्नता विभाग)**

**प्रत :-** मा. वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव